# हिंदू खाटीक समाजातील स्त्रियांचा राजकीय सहभाग" एक ऐतिहासिक आढावा (1990 ते 2023)

**मेघाराणी रमेश सरगर** संशोधक विद्यार्थिनी,इतिहास अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर Email-megharanibangar@gmail.com

---

**प्रस्तावना** –

हिंदू खाटीक समाज हा भारतीय समाज व्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. ऐतिहासिकदृष्ट्या या समाजातील महिलांनी विविध क्षेत्रात योगदान दिले आहे. परंतु राजकीय सहभाग आणि नेतृत्वाच्या संदर्भात त्यांचे योगदान तुलनेने कमी चर्चिले गेले आहे. आधुनिक युगात महिलांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली असून खाटीक समाजातील महिलाही यामध्ये सक्रिय होत आहे. या संशोधनपत्राद्वारे त्यांच्या राजकीय सहभागाचे स्वरूप आव्हाने आणि भविष्यातील संधीचा अभ्यास केला जाईल.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1. शासनाने महिलांच्या राजकीय आरक्षणासाठी केलेल्या कायद्यांचा आढावा घेणे.
2. हिंदू खाटीक समाजातील महिलांच्या राजकीय सहभागाचा आढावा घेणे.
3. महिलांच्या सहभागावर परिणाम करणारे घटक समजून घेणे.
4. समाजाच्या राजकीय जागृतीसाठी घेतलेल्या उपक्रमांचा अभ्यास करणे.
5. राजकीय नेतृत्वात खाटीक महिलांच्या संधी आणि अडचणी यांचे विश्लेषण करणे.
6. भविष्यातील राजकीय सहभाग वाढवण्यासाठी शिफारशी करणे.

**अभ्यासाची संशोधन पद्धती –**

या संशोधनाचे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. या संशोधन पेपरचा आराखडा प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या आधारे रचना केली आहे.

1. प्राथमिक ऐतिहासिक लिखित साधने
2. दुय्यम ऐतिहासिक लिखित साधने
3. मुलाखत
4. वर्तमानपत्रे आणि मासिके
5. इंटरनेट

**'खाटीक' समाज संकल्पना :-**

'खट्टीक' या संस्कृत शब्दावरून खाटीक या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. "खाटीक" या संस्कृत शब्दाचा अर्थ सैनिक असा आहे. 1 सैनिकी पेशातील पराभूत सैनिकांचा मांस विक्रिचा व्यवसाय हा उपजीविकेचा शेवटचा आसरा असावा. आज जे हिंदू लोक मांस विक्रिचा व्यवसाय करतात त्यांना खाटिक म्हणतात मुसलमानांना कसाब असे म्हणतात. संपूर्ण महाराष्ट्रातील हिंदू खाटिक जातीच्या लोकांचा अनुसूचित जाती यादी क्रं 31 वर समावेश करण्यात आला. तद्नंतर या जातीच्या लोकांना शासकीय फायदे सवलती मिळू लागल्या आहेत.

राजकीय सहभागाची संकल्पना

राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला तर राजकिय प्रकियेत विविध पातळयांवर व्यक्तींनी स्वच्छेने भाग घेवून केलेल्या कृती म्हणजे राजकिय सहभाग होय. स्त्रियांच्या राजकिय सहभागाचे दोन प्रकार करण्यात आले. 1)औपचारिक 2)अनौपचारिक औपचारिक राजकिय सहभाग म्हणजे राजकारणातील प्रत्यक्ष सहभाग होय. संसद, विधिमंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, निवडणूका, मतदान इ. चा समावेश होतो. अनौपचारिक राजकिय सहभागामध्ये राज्यातील अप्रत्यक्ष राजकिय सहभाग उदा. महिला संघटन, चर्चासत्र, महिला मेळावे, परिसंवाद, अधिवेशन या माध्यमातून समाजजागृती इ. समावेश होतो.[2]

**स्त्रियांच्या राजकिय आरक्षणाची पार्श्वभूमी**

स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच भारतात 'पंचायतराज व्यवस्था' अस्तित्वात होती. स्वातंत्रोत्तर काळात तिला 'स्थानिक स्वराज्य संस्था' म्हणून मान्यता मिळाली. राज्यधोरणाच्या (कलम 40) मार्गदर्शक तत्वात त्याचा समावेश होता. त्याला अनुसरून विविध राज्यांनी गाव तालुका व जिल्हा पातळीवर पंचायतराज व्यवस्था उभारली. पण या व्यवस्थेच्या

सदस्यात्वामध्ये स्त्रियांना स्थान नव्हते. 1990 मध्ये महाराष्ट्रातील 25 हजार ग्रामपंचातीवर 50 हजार स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होत्या. त्या स्त्रिया राजकीय नेत्यांच्या नातेसंबंधातील किंवा सामाजिक, आर्थिकदृष्ट्या वरच्या वर्गातील असत. महाराष्ट्र, कर्नाटक व इतर काही राज्यात जनता पक्षाने स्थानिक संस्थामध्ये स्त्रियांसाठी 30% राखीव जागा केल्या. सन्मानाने निवडून आलेल्या सदस्य म्हणून त्यांना सत्ता मिळावी. निर्णयकारी संस्थामध्ये स्त्रियांचा सहभाग असणे महत्वाचे आहे. राष्ट्रीय महिला आयोग व अन्य काही गटांनी स्त्रियांच्या आरक्षणाची मागणी केली. स्त्रियांचा निर्णय प्रक्रियेतील समान सहभाग हा न्याय व लोकशाही प्रस्तावित करण्यापुरता मर्यादित नाही तर ती स्त्रियांच्या सबलीकरणाची एक अत्यावश्यक आहे.

**आरक्षणासंदर्भात स्त्रीवादी दृष्टीकोन**

आरक्षणाला विरोध करणारे

1) देशातील सध्याची स्थिती लक्षात घेता केवळ उच्च्वर्णीय राजकारणाचा वारसा असणा-या व सधन महिला आरक्षणाचा फायदा घेतील.

आरक्षण समर्थकांची भूमिका

राजकिय सत्तेत सहभागी झाल्यानंतर देश-विदेशातील अन्य प्रश्नासोबत स्त्रीप्रश्नांकडे देखील संपूर्ण देशाचे लक्ष वेधण्याची व परिणामकारक उपाय सुचविण्याची आणि संसदेबाहेर चालू असणा-या आंदोलनाला बळ देण्याची संधी स्त्रियांना मिळेल.

**खाटिक समाजातील स्त्रियांची स्थिती**

कोणत्याही समाजाचा अभ्यास करीत असताना त्या समाज रचनेमध्ये स्त्रियांची भूमिका काय? असा प्रश्न निर्माण होत असतो. या समाजाच्या बाबतीत असे आढळते. की अजूनही स्त्रियांच्या बाबतीत मुक्त वातावरण निर्माण झालेले नाही. नोकरी करणा-या व काही स्त्रियांचा अपवाद असु शकेल्. या समाजात पुरूषप्रधान संस्कृतीचेच वर्चस्व स्त्रीयांवर असलेले आढळते. शिक्षणाचा अभाव असल्याने आर्थिक दृष्टीने त्या घरातील पुरूषावंर अवलंबून असतात. बाहेरच्या जगाशी कोणताही संबंध या स्त्रियांचा येत नाही त्यामुळे राजकिय पक्षांच्या सभेला जाणे, इतर सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होणे यापासून त्या अलिप्त असतात.

**खाटिक समाज-राजकीय परिस्थिती :-**

राजकिय पक्षांमध्ये सदस्य म्हणून काम करणे, पक्षाचा प्रचार करणे पक्षामध्ये पद मिळविणे. लोकप्रतिनिधी म्हणून काम करणे. राजकिय प्रश्नांबाबत माहिती असणे. निवडणुकीला उभे राहणे यावरून समाजाची राजकिय जागृती किती झालेली आहे हे समजते भारतातील सर्वच पक्षांच्या जातीयवादी राजकारणाचा प्रभाव आज सर्वच श्रेष्ठ कनिष्ठ जातीवर होत असलेला दिसतो.

1) अल्पसंख्याक मागासवर्गीय समाज

हिंदू खाटिक समाज व प्रथमपासूनच अल्पसंख्याक समाज गणला गेलेला आहे. तसेच मांस विक्रिच्या परंपरागत व्यवसायामुळे व समाजाला समाजरचनेच्या दृष्टीने गौण स्थान प्राप्त झालेले आहे. 1978 सालापासून या समाजाला अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट केले आहे.[3] महार, मांग, चांभार, या अनुसूचित जाती स्वातंत्र्यानंतर राजकिय दृष्टीने अधिक संघटित असल्याने या अनुसूचित जातींना जिल्हा परिषद, पंचायत, महानगरपालिका, नगरपालिका अशा संस्थामध्ये मोठया प्रमाणात संधी मिळाली आहे. खाटिक समाज मात्र अशा राखीव जागांच्या सवलतीपासून वंचित ठरलेला आहे.

2) आर्थिक परिस्थिती, सामाजिक प्रतिष्ठा :-

ज्या गावामध्ये खाटिक समाज आर्थिक दृष्टीने संपन्न आहे. विशेष म्हणजे ज्याचे व्यवसाय आधुनिक आहेत त्यांनाच सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली आढळते. खाटिक समाजातील इतर काही ठिकाणी समाज आर्थिक दृष्टीने मागासलेला असल्यामुळे स्थानिक निवडणुकीत पैशाच्या व जातींच्या दबावतंत्रामुळे या समाजातील उमेदवार टिकू शकत नाही. त्यामुळे हा समाज राजकिय सत्तेपासून वंचित असलेला दिसतो.[4]

हिंदू खाटिक समाजातील महिला सदस्यांना राखीव जागेचा फायदा :-

स्थानिक व पातळीवर असलेल्या संस्थामध्ये राखीव जागेचा फायदा आज या समाजाला काही प्रमाणात होत असलेला दिसतो. ज्या ठिकाणी समाज संस्थेने मोठया प्रमाणात आहे. त्याच ठिकाणी असा राजकिय फायदा झालेला आहे. विशेषत: 1980 सालानंतर ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, सहकारी संस्था अशा संस्थामध्ये प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी या समाजातील स्त्रियांना मिळाली आहे.

1) 1985 ते 1992 - पिंपळवंडी ग्रामपंचायत सौ. चंद्रकला राजाराम घोटणे, ग्रामपंचायतीमध्ये मागासवर्गीय सदस्या होत्या.

2) 1992 ते 1997 – सौ. शिला इंगुले, बारामती नगरपरिषदेच्या महिला सदस्या होत्या.

3) 1992 ते 1997 – सौ. मंदा घोणे, जुन्नर नगरपालिकेमध्ये मागासवर्गीय महिला प्रतिनिधी म्हणून संधी मिळाली.

4) 1997 ते 2002 – सौ. रेखा कांबळे, जेजुरी नगरपालिका नगराध्यक्षा मागासवर्गीय महिला म्हणून संधी प्राप्त झालेली आहे.

5) 1996 ते 2001 – सौ. लक्ष्मी विनोदराव व सरगर फलटण, नगरपालिका उपनगराध्यक्षा मागासवर्गीय महिला म्हणून संधी प्राप्त झाली.

6) डिसेंबर 2011 ते डिसेंबर 2017 सौ. अमृता अनिल कांबळे, जेजुरी नगरपालिका, नगरसेविका 7 फेब्रुवारी 2013 ते 13 मार्च 2013, नगराध्यक्षा

7) सौ. रेखा सुनिल कांबळे – 2011 ते 2021, पाचगणी नगरपालिका नगराध्यक्षा, उपसभापती पद भूषविले.

8) सौ. अमृता उमेश प्रभाळे – डिसेंबर 2017 ते डिसेंबर 2022 शाहुपूरी सातारा येथील सरपंचपदी बिनविरोध निवड झाली.

9) सौ. उत्कर्षाराणी उमेश पलंगे 22 फेब्रुवारी 2022 ते 8 ऑगस्ट 2023, नगराध्यक्षा नातेपुते नगरपालिका

10) सौ. कविता शशिकांत थोरात – 2020 ते 2023, सरपंच भोलावडे- किवत ग्रामपंचायत ता. भोर, जि .पुणे

11) सौ. वंदना घोणे, 2001 ते 2006, जुन्नर नगरपालिका, नगरसेवक मागासवर्गीय म्हणून संधी उपलब्ध झाली.

खाटीक जातीच्या महिलांना राखीव जागेचा फायदा राजकीय दृष्टीने होत असताना दिसतो.

**निष्कर्ष :-**

या संशोधनातून असे निष्पन्न होते की, हिंदू खाटिक समाजातील महिलांचा राजकीय सहभाग वाढत असला तरी स्त्रियांचा मतदानाचा निर्णय स्वतंत्रपणे घेण्याचे प्रमाण कमी असलेले दिसते. पती किंवा घरातील मोठया माणसांच्या सल्ल्याने मतदान करतात त्यामुळे पुरूषांपेक्षा या समाजातील स्त्रियांमध्ये राजकिय जागृतीचे प्रमाण कमी असलेले आढळते. या अशिक्षित असल्याने आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे पुरूषांवरच अवलंबून असतात. त्यामुळे या स्त्रियांवर पुरूषांचे वर्चस्व अधिक प्रमाणात आहे.

शिक्षण, कौटुंबिक जबाबदा-या सामाजिक बंधने, आर्थिक अस्तिरता आणि राजकीय पक्षांचा अपुरा धोरणात्मक पाठिंबा कुटुंबियांचा पाठिंबा हि काही महत्वाची कारणे आहेत तरीसुध्दा नवीन पिढीतील महिला या क्षेत्रात पुढे येत असून स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्यांचा सहभाग वाढताना दिसतो.

**शिफारसी**

1) खाटिक समाजातील महिलांसाठी राजकिय प्रशिक्षण आणि नेतृत्व विकास कार्यक्रम राबवावेत.

2) राजकीय पक्षांनी त्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष धोरणे तयार करावीत.

3) समाजातील महिला सक्षमीकरणासाठी शैक्षणिक आणि आर्थिक मदतीसाठी विविध उपक्रम हाती घ्यावीत.

4) स्थानिक पातळीवर महिलांना राजकारणात प्रोत्साहित करणारे सामाजिक संघटनाचे योगदान वाढवावे.

5) सामाजिक माध्यमांचा वापर करून महिलांच्या यशोगाथा प्रदर्शित करून प्रेरणा द्यावी.

**संदर्भग्रंथ सूची**

1) डॉ. पवार वैशाली, “महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख” डायमंड पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती, 2012

2) प्रा.डॉ. विश्वनाथ पवार, प्रा. एम.डीज शिंदे, “इतिहासाचे सिध्दांत, फडके प्रकाशन, सप्टेंबर 2020

3) प्रा.डॉ. घोडके शरद, “खाटिक समाज: राजकिय जागृत्ती, शार्प प्रकाशन, एप्रिल, 2002

4) स्वाती देहाडराय, अनघा तांबे- “स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, 2009

5) कित्ता,

6) क्षत्रिय मराठा धनगर समाज विश्वस्त्, द्विवार्षिक अहवाल अध्यक्ष संपादक, कल्याणकर भानुदास, भवानी पेठ, सन 2001-2002